दिनांक ०१/०६/२०२२

# -:- प्रेसनोट-:-

**तक्रारदार फिर्यादीस कोटला कॉलनी,औरंगाबाद येथील शासकीय निवासस्थान रिक्त केल्या बाबतचा रिपोर्ट पाठविल्याचा मोबदला म्हणुन व रिकव्हरी न काढण्यासाठी तसेच ना-हरकत (एन.ओ.सी.) प्रमाणपत्र देतो असे म्हणुन आ.लो.से. यांनी 20,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती पहिला हप्ता म्हणुन 10,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली आहे.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | औरंगाबाद |
| गुन्हा नोंद क्रं. | पो.स्टे. वेदांतनगर, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.. |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव हुद्दा व पत्ता | श्री.मनोज सांडुजी नरवडे वय-57 वर्षे धंदा- नोकरी पद- स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक (वर्ग-3) सार्वजनिक बांधकाम विभाग,पदमपुरा,औरंगाबाद.रा.बिल्डींग नंबर 35, रुम नं.207,आनंदनगर,कोटला कॉलनी, औरंगाबाद. |
| लाच मागणी रक्कम | 20,000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | 10,000/- रुपये |
| तपास अधिकारी | श्री. हनुमंत वारे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार फिर्यादी हे शासकिय तंत्र निकेतन, जालना येथुन दिनांक 31/08/2021 रोजी फोरमन (कार्यदेशक ) या पदावरुन सेवानिवृत्त झालेले असुन ते सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी कोटला कॉलनी,औरंगाबाद येथील शासकीय निवासस्थान रिक्त केल्यानंतर यातील आरोपी लोकसेवक श्री.मनोज सांडुजी नरवडे वय-57 वर्षे धंदा- नोकरी पद- स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक (वर्ग-3) सार्वजनिक बांधकाम विभाग, पदमपुरा,औरंगाबाद.रा.बिल्डींग नंबर 35, रुम नं.207, आनंदनगर, कोटला कॉलनी, औरंगाबाद. यांनी फिर्यादीस कोटला कॉलनी,औरंगाबाद येथील शासकीय निवासस्थान रिक्त केल्याबाबतचा रिपोर्ट पाठविल्याचा मोबदला म्हणुन व रिकव्हरी न काढण्यासाठी 20,000/- रुपये लाचेची मागणी केली. दिनांक 26/05/2022 रोजी तक्रारदार यांचे तक्रारीवरुन,दिनांक 31/05/2022 रोजी लाचमागणी पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान आ.लो.से. श्री. नरवडे यांनी तडजोडी अंती दिनांक 01/06/2022 रोजी 10,000/- लाचेची रक्कम स्विकारली आहे. आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेण्यात आले आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री.मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक- श्री.हनुमंत वारे यांनी कारवाई केली आहे. त्यांना सदरच्या कारवाई कामी पो.अंम.साईनाथ तोडकर, अशोक नागरगोजे, सोमीनाथ थेटे यांनी मदत केली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

**ई- मेल** :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

**ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन** :- acbmaharashtra.net

**फेसबुक** :- www.facebook.com-Maharashtra.gov.in

संपर्क क्रं. :- 0240-2344050, **टोल फ्रि क्रं.** 1064,

पोलीस अधीक्षक :- 8888807299

अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994

पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

(मारुती शंकर पंडित)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद.